# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
# वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
# तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान व अभियांत्रिकी सामाईक प्रवेश परीक्षा
## (एमएचटी- सीईटी-२०१०)

**प्रेस नोट** दिनांक : ०४ मे, २०१०

- गतवर्षीप्रमाणेच यंदाचे वर्षीही महाराष्ट्र शासनाने मा. डॉ.विजयकुमार गावित, मंत्री, वैद्यकीय शिक्षण, मा.श्री.राजेश टोपे, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, मा. प्रा.श्रीमती.वर्षाताई गायकवाड, राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण आणि मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आदी मान्यवरांच्या पुढाकाराने आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या तीनही व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी एकच सामाईक प्रवेश परीक्षा गुरुवार, ०६ मे, २०१० रोजी राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्याचे ठरविले आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ या वर्षासाठी आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या तीनही अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना 'सक्षम प्राधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे.
- सदर प्रवेश परीक्षेसाठी खालील प्रमाणे जागा उपलब्ध आहेत.

| अनु क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालये | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|
| १. | आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम | ६० | ३९०५ |
| २. | अभियांत्रिकी अभ्यासक्रम | २७१ | ८७६०६ |
| ३. | औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम | १४१ | ८३४५ |

- **उपरोक्त अभ्यासक्रमांव्यतिरिक्त शासनामार्फत यंदापासून वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बीपीएमटी (बॅचलर ऑफ पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी) हा नविन निमवैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर अभ्यासक्रमांमधील प्रवेश एमएचटी-सीईटी २०१० च्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमामध्ये एकूण १९ विविध निमवैद्यकीय अभ्यासक्रमांचा समावेश असून राज्यातील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमाच्या दृष्टीने आवश्यक व उपलब्ध सोयी सुविधांच्या अनुषंगाने एकूण १०१६ जागा तर महानगरपालीकेच्या ३ महाविद्यालयांमध्ये ८० जागा प्रवेशासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.**
- सदरची प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी-२०१०) ही गुरुवार, दिनांक ०६ मे, २०१० रोजी महाराष्ट्रातील ३५ जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात येणार आहे. सदर प्रवेश

परीक्षेसाठी एकूण २ लाख ८५ हजार २६० विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. सदर प्रवेश परीक्षेसाठी राज्यातील एकूण ७४० कनिष्ठ महाविद्यालये परीक्षा केंद्रे म्हणून निश्चीत करण्यात आली आहेत. त्यापैकी मुंबई शहरातून एकूण १२६३६ तर मुंबई उपनगरातून एकूण २३७४६ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. या प्रवेश परीक्षेसाठी एकूण ७६ शाळा/महाविद्यालये यांची परीक्षा केंद्रे म्हणून निवड करण्यात आली आहे.

- वरील ७६ परीक्षा केंद्रांपैकी मुंबई शहरामध्ये कुलाबा ते माटुंगा या भागामध्ये एकूण ३१ परीक्षा केंद्रे तर मुंबई उपनगरांमध्ये पश्चिम उपनगरांमध्ये माटुंगा ते अंधेरी आणि मध्य उपनगरांमध्ये माटुंगा ते विद्याविहार या भागांमध्ये एकूण ४५ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.
- तसचे ठाणे जिल्हयातून एकूण २२७३९ विद्यार्थी परीक्षेस बसणार असून सदर जिल्हयाकरिता एकूण ५६ परीक्षा केंद्रांची निवड करण्यात आलेली आहे.
- दिनांक ०६ मे २०१० या दिवशी गुरुवार असल्याकारणाने सदरचा दिवस हा कार्यालयीन कामकाजाचा दिवस आहे त्यामुळे परीक्षेसाठी बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, **विद्यार्थ्यांनी नियोजीत वेळेत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याच्या दृष्टीने घरातून नियोजीत वेळेच्या किमान १ ते २ तास आधी निघावे. जेणेकरुन परीक्षा केंद्रावर वेळेवर उपस्थित राहणे शक्य होईल.**
- गुरुवार, दिनांक ०६ मे, २०१० रोजी होणाऱ्या एमएचटी-सीईटी-२०१० या प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| **विषय** | **परीक्षेची वेळ** |
|---|---|
| भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र | सकाळी, १०.०० ते ११.३० |
| जीवशास्त्र | दुपारी, १२.०० ते १.३० |
| गणित | दुपारी, ३.०० ते ४.३० |

- भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र पेपरकरिता सकाळी ९.१५ वाजता विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. तर गणिताच्या पेपरकरिता विद्यार्थ्यांना दुपारी २.१५ वाजता परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे. याकरिता विद्यार्थ्यांनी सकाळी परीक्षा केंद्रावर किमान १ तास आधी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.
- गतवर्षी भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयांचा पेपर संपल्यानंतर जीवशास्त्र या विषयाचा पेपर सुरु होण्या दरम्यानचा प्राप्त होणार कमी कालावधी लक्षात घेता दोन पेपर मधला कालावधी वाढविण्यात आला आहे.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयांमधून प्रवेश परीक्षेची ॲडमीट कार्ड उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. महाराष्ट्राबाहेरील जे विद्यार्थी या परीक्षेस बसले आहेत त्यांना त्यांनी अर्ज सादर केलेल्या विभागीय प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयातून ॲडमिट कार्ड प्राप्त करुन देण्यात आली आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांची ॲडमिट कार्ड परीक्षेपूर्वी गहाळ झाली असतील त्यांनी डुप्लीकेट

ॲडमिट कार्ड प्राप्त करुन घेण्याकरीता संबंधित निवासी उप-जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधणे गरजेचे आहे.

- गतवर्षी प्रमाणे आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या तीनही अभ्यासक्रमांसाठी ही प्रवेश परीक्षा एकत्रितरित्या होत असल्याने आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या तीन विषयांची परीक्षा देणे आवश्यक आहे. तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांची परीक्षा देणे गरजेचे आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना दोन्ही अभ्यासक्रमांसाठी परीक्षेला बसावयाचे असल्यास सदर विद्यार्थ्यांना दोन्ही अभ्यासक्रमाच्या परीक्षांना बसू देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे परीक्षा केंद्रांचे वर्गीकरण करण्यात आले असून राज्यातून बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | केंद्राचा प्रकार | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | फक्त आरोग्य विज्ञान | बी.बी. | ३३६६३ |
| २. | फक्त अभियांत्रिकी | एम.एम. | १०५७२१ |
| ३. | दोन्ही अभ्यासक्रमाकरिता बसणारे | एम.बी. | १४५८७६ |
| | **एकूण :** | | **२८५२६०** |

- प्रत्येक परीक्षा केंद्रावर आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर १४४ कलम दिनांक ०६ मे, २०१० रोजी सकाळी ६.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत लागू राहील. या कलमानुसार दोन किंवा दोन पेक्षा जास्त व्यक्तींच्या जमावाला परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परीसरात प्रतिबंध करण्यात आला आहे.
- तसेच उपरोक्त कालावधीमध्ये परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परीसरात झेरॉक्स यंत्र, इंटरनेट सुविधा व दुरध्वनी केंद्रे बंद करण्यात येणार आहेत.
- परीक्षा केंद्रांमध्ये परीक्षार्थी विद्यार्थ्यांशिवाय कोणत्याही व्यक्तीस प्रवेश देण्यात येणार नाही किंवा परीक्षा संपेपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्यास केंद्र सोडून बाहेर जाता येणार नाही.
- **परीक्षा केंद्रामध्ये मोबाईल फोन, पेजर, लॅपटॉप, कॅलक्युलेटर इत्यादी नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.**
- परीक्षा केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना फक्त काळे बॉलपॉईंट पेन, ॲडमिट कार्ड, रिसिप्ट-कम-आयडेंटीटी कार्ड नेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना लॉग टेबल प्रश्नपत्रिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- एमएचटी-सीईटी-२०१० या प्रवेश परीक्षेचा निकाल दिनांक १४ जुन, २०१० पर्यंत जाहिर करण्यात येणार आहे.
- या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची पुढील प्रवेश प्रक्रिया वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालयामार्फत तर अभियांत्रिकी आणि

औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत करण्यात येणार आहे.

- सदर प्रवेश परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांकडून 'प्रेफरन्स फॉर्म' भरुन त्यांची आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी निवड करण्यात येईल.
- वैद्यकीय, दंत आणि बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी संबंधित परीषदांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दिनांक ३० सप्टेंबर, २०१० ही प्रवेशाची अंतिम तारीख जाहिर करण्यात आली आहे. सदर तारखेनंतर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमासाठी कोणतेही प्रवेश केले जाणार नाहीत.

:: :: :: :: :: :: ::